P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक - ११/०१/२०२४**

**दि. १०/०१/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली १७/२०२४ भा.द.वि.क. ३९४,३९७,३४ आर्म ॲक्ट कलम ४ (२५) मपोका कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक.०८/०१/२०२४ रोजी रात्रौ ११/३० वा चे सुमारास वेलनेस मेडीकल समोर, चेरी चौक पुर्णानगर चिखली पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.१०/०१/२०२४ रोजी ०१/२२ वा |
| फिर्यादी | :- | बालाजी भानुदास गायकवाड वय ५४ वर्षे, धंदा . रिक्षा ड्रायव्हर रा. फ्लॅट नं.४०६ सी- २८ निसर्ग हौसींग सोसायटी , घरकुल चिखली |
| आरोपी | :- | १.आदित्य आडे ,<br>२.संजय मरगुडे, पुर्ण नाव पत्ता माहित आहे.<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचे मेव्हुना अनिल धायगुडे हे वेलनेस मेडीकल चिखली पुणे येथे औषध गोळया घेण्यासाठी रिक्षा घेवुन आले असता सदर मेडीकल समोर उभा असलेले आरोपी मजकुर हे फिर्यादीस बोलले की आम्हाला केएसबी चौकात सोडा. फिर्यादीने केएसबी चौकात सोडण्यास नकार दिला असता त्यावर चिडुन जावुन आरोपी क्रं २ याने पाण्याची बाटली फिर्यादीचे डोक्यात मारली व त्याने लपवुन ठेवलेला कोयता काढुन फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी केले. आरोपी क्रं १ यांने लाकडी दांडक्याने फिर्यादीचे पाठीवर हातावर मारहाण करुन फिर्यादीचे खिशातील ३३००/-रोख रक्कम व ५०००/- रु किं चा रेडमी कंपनीचा मोबाईल फोन जबरदस्तीने काढुन घेतले तसेच ॲटो रिक्षाची चावी ही काढुन फेकुन दिली. फिर्यादी यांचा मेव्हुना अनिल धायगुडे हा फिर्यादी यांना वाचवण्यासाठी मधी गेला असल्याने त्यास आरोपी मजकुर यांनी हाताने मारहाण करुन वाईट वाईट शिवीगाळी केली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्री. संजय बारवकर पोलीस उप- निरीक्षक, ९८२३३५५०६० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी १९/२०२४ भादवि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०९/०१/२०२४ रोजी ११/३० वा सेक्टर १२, क्रांती चौकाजवळ, एसीयन कन्ट्रक्शनचे कार्यालय समोर, एमआयडीसी भोसरी |
| गुन्हा दाखल | :- | दि.१०/०१/२०२४ रोजी०१/२० वा |
| फिर्यादी | :- | जितेंद्र रेवाप्पा कांबळे वय ५१ वर्ष धंदानोकरी रा. स.नं. ५५/२, लेननंबर १४, गोकुळनगर, धानोरी पुणे |
| आरोपी | :- | १.अमित जगताप वय २५ वर्ष २) प्रशांत जगताप वय ५० वर्ष रा. मोशी पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी आरोपी क्रं १ यास कामातील पाईपच्या लांबी बाबत विचारणा केल्याचे कारणावरुन आरोपी क्रं १ याने वाईट शिवीगाळ करुन, "तु मला शहानपण शिकवु नको,तुला बघुन घेतो,तु येथुन कोठेही जावु नको तुला दाखवितो" असे म्हणुन धमकी देवुन, आरोपी क्रं २ याने तुम्ही आरोपी क्रं १ याला शिवीगाळ का केली असे म्हणुन फिर्यादीला हाताने मारहाण करुन, आरोपी क्रं १ याने लाकडी बांबुने फिर्यादीचे दोन्ही पायाचे मांडीवर मारुन जखमी केले. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा दातार ९६२३४४११४८ |

०३

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी १८/२०२४, विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ चे कलम १४, आणि पारपत्र ( भारतामध्ये प्रवेश) अधिनियम, १९२० चे कलम ३(२)(अ) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०१/२०२४ रोजी १५.०९ वा<br>मौजे शिंदे ता खेड जि पुणे गावचे हद्दीत जी.ई.कंपनीचे शेजारी कंपनी करीता उभारण्यात येणारे नविन शेडचे कामाचे ठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक १०/०१/२०२४ रोजी १५.०९ वा |
| फिर्यादी | :- | संपत मारुती मुळे वय ४२ वर्ष, व्यवसाय नोकरी, (पोलीस हवालदार/९०८)नेमणुक महाळुंगे एम.आय.डी.सी. स्टेशन, पिंपरी चिंचवड, मोबाईल नंबर ८८८८६५०६५० |
| आरोपी | :- | सुब्रोतो सुशिल बैद्य, वय २५ वर्ष राहणार बहादुरपुर, उपजिल्हा आगैलझारा, जिल्हा बोरीसल, बांगलादेश<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने तो बांगलादेशी नागरिक असल्याचे त्यास माहिती असताना व त्याचे स्वतः जवळ भारत देशामध्ये प्रवेश करणे व वास्तव्य करणे याबाबत कोणतीही कायदेशीर परवानगी नसल्याचे माहिती असताना त्याने भारत देशामध्ये गैरमार्गाने प्रवेश करुन, घुसखोरी करुन महाळुंगे पोलीस स्टेशन हद्दीमध्ये एम.आय.डी.सी. परिसरात वास्तव्य करीत असताना मिळुन आल्याने गुन्हा दाखल |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्री दत्तात्रय जाधव, पोउपनि ९९२२९४७६२३ |

०४

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी १९/२०२३ भादवि कलम ३८० |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२७/१२/२०२३ रोजी २०.०० वा.ते दि.२९/१२/२०२३ रोजीचे सकाळी ०८.०० वा. चेदरम्यान मौजे निघोजे, पॉलिरब एक्ट्रोजन्स इंडीया प्रा.लि. कंपनीता. खेड |
| गुन्हा दाखल | :- | दि. १०/०१/२०२४ रोजी २२.४६ वा. |
| फिर्यादी | :- | अभिमान दामोदर वाघमारे वय ४४ वर्ष, धंदा - प्रॉडक्शन सुपरवायझर (नोकरी) सध्या रा. निघोजे, संजय यादव यांचे भाडयाचेखोलीत, ता. खेड जि.पुणे मुळ रा. म्हाळसा ता. जि. बिड |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी पॉलिरब एक्ट्रोजन्स इंडीया प्रा.लि. कंपनी ता. खेड जि.पुणे येथे कोणीतरी अज्ञात इसमाने स्टोरेज रूमचे मागील उघडया दरवाजा वाटे आत प्रवेश करुन आतील एकुण १९३३ किलोग्रॅम वजनाचे एकुण कि.रु. ३,२३,७१०/- रु. चे रबरचे कच्चे पार्ट चोरी करुन चोरुन नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा ४८६ जायभाये ८२०८९९०५६० |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ३२/२०२४, भा.द.वि कलम ३०४(अ), २७९ मो.वा.कायदा कलम १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०९/०१/२०२४ रोजी ०६.३० वा. सुम पिंपरीगांव ते काळेवाडी जाणारे रस्त्यावरील ब्रिजवर, मधोमध काळेवाडी, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि. १०/०१/२०२४ रोजी १८.१२ वा. |
| फिर्यादी | :- | ओम विनोद कुमार चंदानी वय २१ वर्षे, व्यवसाय- कपडे दुकान, रा.फ्लॅट नं सी. १९, साई रेसीडेन्सी, संत निंरकारी सत्संग समोर विजयनगर, काळेवाडी, पुणे. |
| आरोपी | :- | सचिन शाहुराव भिंताडे रा.लाकडी वखार जवळ पवनानगर काळेवाडी पुणे. मुळ रा. कोरडेवाडी, ता.केज जि.बीड<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी पिंपरीगांव ते काळेवाडी जाणारे रस्त्यावरील ब्रिजवर, मारुती सुझुकी कंम्पनीचा कॅरी मॉडेलचा चारचाकी टॅम्पो क्र. एम.एच.१४/एल.बी ०५१२ या वाहनाचा चालक नमुद आरोपी याने त्याचे ताब्यातील टॅम्पोमध्ये यातील मयत इसम नामे विनोद कुमार आसुदोमल, वय ५१ वर्षे रा. रेसिडेन्सी रिलायन्स मार्ट जवळ, साई इनक्यु फ्लॅट नं. सी/१९, पिंपरी पुणे. यास अनाधिकृतपणे/ धोकादायकरित्या टॅम्पोमध्ये पाठीमागे माल पकडण्यासाठी उभे करुन सदरचा टॅम्पो निष्काळजीपणाने व हयगयीने, बेदकारपणे चालवुन यातील मयत इसम हा टॅम्पोतुन खाली रस्त्यावर पडुन त्याचे डोक्यास गंभीर मार लागुन मयत होण्यास कारणीभुत झाला आहे. |

म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- श्री. भारत माने, पोलीस उप-निरीक्षक, ९१०८८८८३५२

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण २४/२०२४ भादवी का क ३०४(अ),२७९,३३७,,३३८,४२७ मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०१/२०२४ रोजी सकाळी ११/०० वा.चे सुमारास आळंदी फाटा पुणे हायवे चाकण पुणे

गुन्हा दाखल :- दि .१०/०१/२०२४ रोंजी १५/४३ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- १)ट्रेलर नंबर एच आर ५५ ए आर/०६८७ वरील चालक नामे दिपक राघव बुलासिंग रा.शेखुपुर जटवाई बुंलदशहर अनुपशहर राज्य उत्तरप्रदेश
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादी आई (मयत),वय ७१ वर्षे हया फिर्यादी यांच्या ॲक्टीव्हा एम.एच.१४/इ.एल/ ९२०३ हिचेवरुन चाकण येथुन मोशीकडे जात असताना आळंदी फाटा नाशीक पुणे हायवे चाकण पुणे येथे सिग्नलवर थांबलो असता ट्रेलर नं एच.आर ५५/ए.आर/ ०६८७ यावरील चालक याने त्याचे ताब्यातील ट्रेलर हा वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन हयगयीने भरधाव वेगाने चालवुन फिर्यादी चे ताब्यातील ॲक्टीव्हा मोटार सायकलला पाठीमागुन जोराची धडक देवुन फिर्यादीस जखमी करुन फिर्यादीचे आईच्या डोक्यावरुन छातीवरुन ट्रेलर घेवुन जावुन तिचे मरणास कारणीभुत झाला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि डेरे चाकण ८८३००६९२०१

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी ११/२०२४, भादवि कलम-५०४,५०६, ४२७, ३४, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट कलम-३,७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३)/१३५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०९/०१/२०२४ रोजी १९/४० वा व २०/५० वाचे सुमारास रा. सोमेश्वर मंदिराच्या मागे, राजनगर ओटास्कीम निगडी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दिनांक. १०/०१/२०२४ रोजी ००/३८ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- १)अजय रामु चौधरी वय २१ वर्षे धंदा नोकरी रा श्रीराम हौ सो रुपीनगर तळवडे पुणे
२. रितेश सोनवणे (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही ) ३. एक अनोळखी इसम (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही )
**आरोपी क्रं १ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर यांनी संगणमत करुन, मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पुणे यांचे शस्त्र बंदी आदेशाचा भंग करुन, फिर्यादी यांना ा मारुन टाकणार अशी धमकी देऊन जमलेल्या लोकांना देखील शिवीगाळी केली तसेच आरोपी क्रं १ याने मित्राच्या मारेकऱ्यानां पैसे पुरवतो का, असे म्हणुन फिर्यादी व निलेश भंडारी यांना शिवीगाळी करुन, घराच्या पत्र्याचे नुकसान केले. तसेच आरोपी मजकुर हातात कोयता व काठया हवेत फिरवत मोठमोठयाने आरडाओरडा करुन, आजुबाजुच्या लोंकाना धमकावुन दहशत निर्माण करत होते म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सहा पो फौज वाघोले निगडी पो ठाणे ९८२२१७१४१७

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ००/२०२४ भा.द.वि.कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०८/०१/२०२४ रोजी १४.०० वा ते १६.०० वा वाकडेवाडी पुणे ते बोपोडी पुणेच्या दरम्यान |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/०१/२०२४ रोजी २०/३३वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | दोन अज्ञात महिला |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी हे गुडलक चौक ते डेक्कन ते निगडी असा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना बसमध्ये मधल्या जागेत फिर्यादी यांनी ठेवलेल्या तीन पिशव्यापैकी एका पिशवीमध्ये ब्राउन रंगाच्या पर्समध्ये ठेवलेल्या पाउच मधील ७७,०००/- रु किं चे २ तोळे ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने प्रवासादरम्यान दोन अनोळखी महिलांनी फिर्यादी यांचे चित्त विचलीत करुन हातचलाखी करुन पिशवीतील पर्समधील पाउच मधील दागिने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करुन नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | गुन्हा पुणे शहर येथे खडकी पोलीस स्टेशनला वर्ग केला आहे |